१९८५ चा
महाराष्ट्र २

## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1985

## THE MOTOR VEHICLES (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1985

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १६ ऑगस्ट १९८५ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१९८५ चा
महाराष्ट्र २

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1985

## AN ACT FURTHER TO AMEND THE MOTOR VEHICLES ACT, 1939, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २१ ऑगस्ट १९८५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६

**'मोटार वाहन अधिनियम, १९३९' हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९३९ चा चार. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी 'मोटार वाहन अधिनियम, १९३९' हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छत्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास 'मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८५' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९३९ चा अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम १५ ची सुधारणा.

२. मोटार वाहन अधिनियम, १९३९ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्याच्या कलम १५ मध्ये,— १९३९ चा चार.

(अ) पोट-कलम (१) मध्ये, "जर लायसन प्राधिकरणाने" या शब्दानंतर "किंवा इतर विहित प्राधिकरणाने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (२) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२) (अ) असा कोणताही आदेश काढल्यानंतर त्याची बाधा पोचलेली व्यक्ती चालन लायसनधारक असेल आणि जर तिने अगोदरच ते चालन लायसन परत केले नसेल तर तिला यथास्थिती लायसन प्राधिकरणाकडे किंवा इतर विहित प्राधिकरणाकडे ते परत करावे लागेल.

(ब) चालन लायसन ज्यांच्याकडे परत केलेले आहे ते इतर विहित प्राधिकरण, पोट-कलम (१) अन्वये अशा इतर विहित प्राधिकरणाने काढलेल्या आदेशाच्या प्रतीसह ते चालन लायसन, यथास्थिती चालन लायसन ज्याने दिले त्या लायसन प्राधिकरणाकडे अथवा अगदी शेवटी ज्याने त्याचे नवीकरण केले होते त्या लायसन प्राधिकरणाकडे पाठवील.

(क) चालन लायसन यथास्थिती ज्याच्याकडे परत केलेले असेल अथवा वरीलप्रमाणे ते ज्याच्याकडे पाठविले असेल ते लायसन प्राधिकरण,—

(एक) जर ते लायसन या अधिनियमाखाली देण्यात आलेले चालन लायसन असेल तर, निरर्हतेची मुदत संपेपर्यंत किंवा निरर्हता काढून टाकण्यात येईपर्यंत ते ठेवून घेईल ; किंवा

(दोन) जर ते या अधिनियमाखाली देण्यात आलेले चालन लायसन नसेल तर; त्यावर निरर्हतेचा शेरा नमूद करील व ज्या लायसन प्राधिकरणाने ते लायसन दिले असेल त्याच्याकडे ते पाठवील :

परंतु, एखाद्या व्यक्तीच्या चालन लायसनानुसार, त्या व्यक्तीला एकाहून अधिक वर्गाची किंवा वर्णनाची मोटार वाहने चालवण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल आणि पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशान्वये तिला एखाद्या विशिष्ट वर्गाचे किंवा वर्णनाचे मोटार वाहन चालवण्यास निरर्ह ठरवण्यात आले असेल तर लायसन प्राधिकरण चालन लायसनवर निरर्हतेचा शेरा नमूद करून ते त्या लायसनधारकाकडे पाठवील.";

**(क)** पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) दोन्ही ठिकाणी जेथे "लायसन प्राधिकरण" हा मजकूर आलेला असेल तेथे तेथे त्या मजकुरानंतर "किंवा इतर विहित प्राधिकरण" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) "विहित प्राधिकरण" या शब्दांऐवजी "विहित अपील प्राधिकरण" हे शब्द दाखल करण्यात येतील ;

(ड) शेवटी पुढील स्पष्टीकरणाची भर घालण्यात येईल :—

"**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "इतर विहित प्राधिकरण" म्हणून नियमांनुसार, पोलीस आयुक्तांची नियुक्ती जेथे झालेली असेल अशा क्षेत्रांमध्ये सहायक पोलीस आयुक्तांपेक्षा कमी दर्जाचा नसेल असा पोलीस अधिकारी आणि इतर सर्व क्षेत्रांमध्ये पोलीस उप-अधीक्षकांपेक्षा कमी दर्जाचा नसेल असा अधिकारी विहित करण्यात येईल."

(ई) समासातील टीपेमधील "लायसन प्राधिकरण" या शब्दांनंतर "किंवा इतर विहित प्राधिकरण" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ६४ मधील पोट-कलम (२) मध्ये "आणि ते अधिकरण म्हणजे जिल्हा न्यायाधीशाहून कमी दर्जाचा नसलेला एखादा न्यायिक अधिकारी असेल" या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

१९३९ चा अधिनियम क्रमांक चार याच्या कलम ६४ ची सुधारणा.

"आणि ते अधिकरण म्हणजे जी व्यक्ती—

(क) एखाद्या उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा होती; किंवा

(ख) जिल्हा न्यायाधीश आहे किंवा होती; किंवा

(ग) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्ती होण्यास अर्हताप्राप्त आहे,

अशी व्यक्ती असेल.".

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटोल,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.